राष्ट्रीय आरोग्य अभियानातंर्गत राज्यातील कार्यरत कंत्राटी कर्मचा-यांच्या नियमित पदावरील समावेशनाबाबत...

# महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक आरोग्य विभाग
## शासन निर्णय क्रमांक:- एनएचएम-११२५/प्र.क्र.४५५/एनएचएम

१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक : ०४ नोव्हेंबर, २०२५

**वाचा :-**

१. दिनांक १३/०३/२०२४ रोजी झालेल्या मा. मंत्रिमंडळाच्या निर्णयाचे इतिवृत्त.

२. शासन निर्णय क्र:- बैठक-२८२३/प्र.क्र.४३०/आरोग्य-७, दि.१४.०३.२०२४

३. मा. मंत्रीमंडळाच्या दिनांक ०४/११/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णय.

**प्रस्तावना :-**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचा-यांपैकी १० वर्ष व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या कर्मचा-यांच्या सेवा समायोजनासाठी सार्वजनिक आरोग्य विभागातील मंजूर समकक्ष पदांचे सेवाप्रवेश नियम सुधारित करुन त्यामध्ये रिक्त होणा-या समकक्ष पदांवर सरळ सेवेने ७० टक्के व समावेशनाने ३० टक्के याप्रमाणे भरती करण्याबाबत सेवाप्रवेश नियमात सुधारणा करण्याबाबत संदर्भ क्र.२ अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. तथापि, सामान्य प्रशासन विभागाने सेवाप्रवेश नियमात समावेशनाने नियुक्तीचा मार्ग विहित करता येऊ शकत नाही, असे अभिप्राय दिले असल्याने व राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचारी यांना संदर्भ क्र. २ रोजीच्या शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत सलग १० वर्ष सेवा पूर्ण झाली आहे, अशा कर्मचा-यांना एक वेळची विशेष बाब म्हणून सेवा समावेशन करण्याबाबत विविध संघटनांची निवेदने विभागास प्राप्त झालेली आहेत. या बाबी विचारात घेता राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचा-यांचे एक वेळची विशेष बाब म्हणून सार्वजनिक आरोग्य विभाग व ग्राम विकास विभागातील आरोग्य सेवेतील समकक्ष नियमित पदांवर सेवा समायोजन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचा-यांच्या सेवा समायोजनाबाबत धोरणात्मक शासन निर्णय दि.१४.०३.२०२४ अन्वये निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयामधील क्र. १ ते ६ पैकी निर्णय क्र.१ मध्ये सुधारणा करुन दिनांक ०४/११/२०२५ रोजी मा. मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयास अनुसरुन खालील प्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे:-

०१. दिनांक १४/०३/२०२४ रोजी राष्ट्रीय आरोग्य अभियानामधील १० वर्ष सेवा पूर्ण झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे समकक्ष पदावर सेवा समायोजन सार्वजनिक आरोग्य विभागातील पदांबरोबर ग्राम विकास विभागामार्फत भरण्यात येणाऱ्या आरोग्य सेवेतील रिक्त पदांवर करण्यात यावे.

०२. हे समायोजन सेवाप्रवेश नियमात दुरुस्ती न करता एक वेळची विशेष बाब म्हणून करण्यात यावे.

०३. सदर दोन्ही विभागातील समकक्ष नियमित पदांपैकी सरळसेवेने भरावयाची सद्यस्थितीत रिक्त असलेली पदे व दिनांक १४/०३/२०२४ रोजी १० वर्ष पूर्ण झालेल्या समकक्ष राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचारी यापैकी जी संख्या कमी असेल तेवढी पदे राखून ठेवावीत.

०४. राष्ट्रीय आरोग्य अभियानातंर्गत राज्यातील कार्यरत कंत्राटी कर्मचा-यांपैकी दिनांक १४/०३/२०२४ रोजी १० वर्ष व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या कंत्राटी कर्मचा-यांचे समायोजन करण्यासाठी कर्मचा-यांच्या सेवा कालावधी एवढी वयाची अट शिथिल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

०५. राष्ट्रीय आरोग्य अभियानातंर्गत राज्यातील कार्यरत कंत्राटी कर्मचा-यांपैकी दिनांक १४/०३/२०२४ रोजी १० वर्ष व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या कंत्राटी कर्मचा-यांचे सेवा समावेशन केल्यानंतर त्यांचे वेतन त्यांना लगतच्या मागील महिन्यामध्ये प्राप्त होणा-या मानधना एवढया नियमित वेतन श्रेणीतील पुढील टप्प्यावर निश्चित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

०६. केंद्र शासनाने राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी कर्मचा-यांच्या शैक्षणिक अर्हतेबाबत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या सुचना / मार्गदर्शक तत्वे यांचे काटेकोरपणे पालन करुन समायोजन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

०७. मा. मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचा-यांचे नियमित पदांवरील समायोजनाकरीता निकष ठरविण्यासाठी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली आंतर विभागीय समिती स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय मा. मंत्रीमंडळाच्या दिनांक ०४/११/२०२५ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५११०४१३३०४६६५१७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NIPUN UMESH VINAYAK

Digitally signed by NIPUN UMESH VINAYAK
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=9ed2330e7f56d2d0585292018f6841d4842107b421a1acd728d23f3c62c246a7, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=66DB581AFF2FBF0992FD5CC282AED74F38288CA8FE0226DC0A3C67A2DD50A6BD, cn=NIPUN UMESH VINAYAK
Date: 2025.11.04 17:13:44 +05'30'

**(डॉ. निपुण विनायक)**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव (५ प्रती) (पत्राने)
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव (५ प्रती), मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
३. सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
४. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
५. सर्व सन्माननीय संसद सदस्य, विधानसभा व विधानपरिषद सदस्य
६. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
७. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)- १, महाराष्ट्र, मुंबई.
८. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
९. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई.
१०. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा) २, महाराष्ट्र, नागपूर,
११. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
१२.महाप्रबंधक, मा. मुंबई उच्च न्यायालय, मुंबई.
१३. प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.
१४. प्रबंधक, मा. लोकायुक्त व मा. उप लोकायुक्त यांचे कार्यालय, नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई.
१५. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,

१६. मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई,
१७. वित्त विभाग/ व्यय- १३, मंत्रालय, मुंबई-
१८.नियोजन विभाग / कार्यासन १४७२, मंत्रालय, मुंबई.
१९.सर्व विभागीय आयुक्त
२०. आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई-
२१ सर्व जिल्हाधिकारी,
२२. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२३. संचालक (आरोग्य सेवा-१), आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई
२४. संचालक (आरोग्य सेवा-२) आरोग्य सेवा आयुक्तालय, पुणे
२५. अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई
२६. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य पुणे
२७. उप संचालक, सर्व मंडळ कार्यालये
२८. सर्व जिल्हा शल्य चिकित्सक, (FWB मार्फत)
२९. सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी, (FWB मार्फत)
३०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३१. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
३२. वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे
३३. सर्व कोषागार अधिकारी
३४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (५ प्रती)
३५.भारती जनता पार्टी,महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरेक नं.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईट, मुंबई -४०००२०
३६. इंडियन नॅशनल कॉग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग दादर , मुंबई -४०००२५
३७.राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी, राष्ट्रपती भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पाईंट, मुंबई-४०००२१.
३८. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०००१
३९. बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई- ४००००१
४०. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस.व्ही. पटेल रोड, मुंबई
४१. भारतीय कम्युनिस्ट (मार्क्सवादी) पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई.
४२. सह सचिव/ उपसचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, कार्यासन सेवा-५, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
४३. सार्वजनिक आरोग्य विभागातील सर्व कार्यासने, मंत्रालय, मुंबई- ४००००१
४४. निवडनस्ती (कार्यासन एनएचएम).